**- पोलीस शिपाई चालक भरती २०१९ -**

जाहिरात क्रमांक

दिनांक ०३/०८/२०२१

## शुध्दीपत्रक

दिनांक ३०/११/२०१९ रोजी पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक (गट-क) ची पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. हया जाहीरातीत स्पर्धात्मक परीक्षा स्थगीत करणे, रद्य करणे, अंशता बदल करणे, पदाच्या एकुण संख्ये मध्ये बदल करण्याचे अधिकार सबंधीत पोलीस घटक प्रमुखांना राहतील व त्याचा निर्णय अंतिम असेल असे स्पष्ट करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

१. मुद्या क्रमांक ५ :- " ऑनलाईन परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या " ऐवजी " ऑफलाईन OMR based परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या " असे वाचावे.

२. मुद्या क्रमांक ११.१४ आणि १३.३ " उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्या प्रमाणे परीक्षा केंद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो तीनही पसंतीक्रमांत उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमूण देण्यात येईल." हे शब्द वगळयात येत असून त्या ऐवजी " उमेदवाराच्या परीक्षाप्रवेश पत्रावर नमुद केलेल्या लेखी परीक्षा केंद्रावर नमुद दिनांकास उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे."

३. सदरील जाहीरातीत जेथे जेथे " ऑनलाईन परीक्षा " असे नमुद केले आहे त्या सर्व ठिकाणी " ऑफलाईन परिक्षा " असे वाचावे.

४. मुद्या क्रमांक ८ :- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक राआधो ४०३९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये एसईबीसी हे आरक्षण रद्य करण्यात आले आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ३१/०५/२०२१ व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०२०/ प्र.क्र. ३२०/१६-ब, दिनांक ०५/०७/२०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार एसईबीसी या प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागा अराखीव ( खुल्या ) प्रवर्गात समाविष्ठ करण्यात याव्यात सामाजिक व शैक्षणीक मागास प्रवर्गा करीता दिलेले आरक्षण रद्य झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी सामाजीक व शैक्षणीक मागास प्रवर्गा करीता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदन पत्र भरले होते त्या करीता पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे :-

(i) मा. सर्वोच्चन्यायालयाने सिव्हिल पिटीशन क्र. ३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार एसईबीसी उमेदवारांचा अराखीव व इडब्लूएस प्रवर्गातुन विचार करण्यात यावा. व असे करतांना एसईबीसीच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गाकरीता विहीत करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडलेली असेल त्यांच्या बाबतीत जाहीरातीत नमुद केल्या प्रमाणे मागावर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादा व परीक्षा शुल्काची सवलत कायम टेवण्यात यावी.

(ii) मा. सर्वोच्चन्यायालयाने सिव्हिल पिटीशन क्र. ३१२३/२०२० मध्ये दिनांक ५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार भरती प्रक्रीया राबविन्या बाबत शासन निर्णय सामान्या प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०२०/प्र.क्र. ३२०/१६-ब दिनांक ०५/०७/२०२१ मधील परिच्छेद क्रमांक ७ मधील तरतुदी नुसार एसईबीसी वर्गा करीता राखीव असलेली पदे अराखीव पदामध्ये रुपांतरीत करुन व एसईबीसी प्रवर्गातुन अर्ज केलेल्या उमेदवारा कडून " अराखीव" अथवा " आर्थीक दृष्टया मागास " प्रवर्गाचा विकल्प घेवून पुर्व परिक्षेचे आयोजन करावे असे नमुद आहे.

(iii) उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन ज्या उमेदवारांनी सामाजीक व शैक्षणीक मागास प्रवर्गाकरीता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते अश्या उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार आर्थीक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाथ अथवा अराखीव (खुला) या पैकी एक विकल्प निवडावा.

(iv) जे उमेदवार आर्थीक दुर्बल घटक ( EWS ) आरक्षणाचा लाभ घेण्यास ईच्छूक / पात्र असतील तर त्यांनी संकेतस्थळावर जावून ( EWS ) विकल्प निवडावा.

(v) ४(iv) वगळता EWS न निवडलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर जावून अराखीव ( खुला ) हयावर क्लीक करुन अराखीव (खुला) पदाचा विकल्प निवडावा.

(vi) एसईबीसी या प्रवर्गातील जे उमेदवार आर्थीक दुर्बल घटक हा विकल्प निवडतील त्या उमेदवारांनी शारीरीक चाचणीच्या वेळी आर्थीक दुर्बल घटका बाबतचे प्रमाणपत्र सोबत आणावे. जे उमेदवार प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांना पुढील भरती प्रक्रीयेत सहभागी होता येणार नाही. तसेच त्यांना त्यावेळी प्रवर्गही बदलता येणार नाही.

(vii) सामाजीक व शैक्षणीक मागासप्रवर्गातील उमेदवारांना आर्थीकदृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव ( खुला प्रवर्ग ) विकल्पाबाबतच्या ईडब्लुएस प्रमाणपत्र व नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६.०७.२०२१ मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. निवड प्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केलेल्या ज्या जाहीरातीमध्ये ईडब्लूएस आरक्षण लागु आहे, अशा निवडप्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्युएस आरक्षण अनुज्ञेय करतांना, सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परीक्षांसाठी मार्च २०२० पर्यंत ग्राहय असणारे ईडब्लूएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला) असा विकल्प देतील अश्या महीला उमेदवारांनी सबंधीत पदाची / परीक्षेची जाहीरात (दोन किंवा अधिक टप्यांची परीक्षा असल्यास पुर्व परीक्षेची ) प्रसिध्द झालेला आहे, त्या जाहीरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्त झालेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राहय धरण्यात यावे.

(viii) आर्थीक दुर्बल घटक ( EWS ) व अराखीव ( खुल्या ) चा विकल्प घेण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पोलीस कॉर्नर या बटनवर क्लिक केल्यानंतर पोलीस भरती- २०१९ वर क्लिक करावे. त्यानंतर Web link वर क्लिक करुन उमेदवारांनी ज्या घटकासाठी आवेदनपत्र सादर करण्यात केलेले आहे त्या घटकासाठी URL देण्यात आलेला आहे, त्यावर क्लिक करावे व सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

(ix) विशेष सुचना :- प्रत्येक उमेदवारांनी वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर जावून त्यांनी ज्या घटकांतर्गत आवेदनपत्र सादर केलेले आहेत त्या घटकांतर्गत निवड करुन उमेदवारांनी स्वत:चा Password बदल करुन घ्यावा.

(x) एसईबीसी प्रवर्गातुन अर्ज केलेल्या उमेदवारांना " अराखीव " अथवा " आर्थीक दृष्टया मागास " प्रवर्गाचा विकल्प निवडण्याची सुविधा हे शुध्दीपत्रक प्रसिध्द झाल्यापासुन म्हणजेच दिनांक ०५/०८/२०२१ पासुन ते दिनांक १५/०८/२०२१ रोजी २४.०० वा. पर्यंत उपलब्ध राहील.

( प्रशांत होळकर )
पोलीस अधीक्षक, वर्धा.